**<u>नियमित दिवाणी दावा क्र.६९/२०२३</u>**
**<u>वादीतर्फे सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी क्र.१८ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –
**<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक  यांच्यामार्फत पुढील सरतपासः–</u>**

३१. नि.क्र.१८ वर माझे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर असल्यामुळे मी त्यावर माझी सही केलेली आहे. मी सदर प्रकरणामध्ये नि.क्र.१७ च्या यादीसोबत कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

३२. आता मला उपविभागीय अधिकारी यांची दि.०७.१२.२०१२ ते दि.२९.१२.२०१२ च्या दैनंदिनीची सत्यपत्र दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२२** देण्यात येत आहे. आता मला शेती विक्री परवानगी मिळणेकामी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अर्जाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२३** देण्यात येत आहे.

३३. आता मला दि.०७.१२.२०१२ रोजी मंडळ अधिकारी यांच्याकडे जमीन विक्री करण्याबाबतचा अर्ज दाखविण्यात आला. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२४** देण्यात येत आहे. आता मला दि.०७.१२.२०१२ रोजी तलाठी, मनाळी यांच्याकडे जमीन विक्री करण्याबाबतचा अर्ज दाखविण्यात आला. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२५** देण्यात येत आहे.

३४. आता मला जाहिरनाम्याची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रमाणित प्रत ही नायब तहसिलदार यांच्या कार्यालयातून काढलेली आहे. त्यास **नि.क्र.२६**

देण्यात येत आहे. आता मला उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांना दि.०७.१२.२०१२ रोजी मंडळ अधिकारी, पारस यांनी पाठविलेल्या अहवालाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२७** देण्यात येत आहे. आता मला उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांना दि.२७.१२.२०१२ रोजी तलाठी यांनी पाठविलेल्या अहवालाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२८** देण्यात येत आहे.

३५. आता मला पंकज श्रीकांत इधोळ यांचे दि.२८.१२.२०१२ रोजीचे बयाणाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.२९** देण्यात येत आहे. आता मला गजानन लक्ष्मण बोरकर यांचे दि.२८.१२.२०१२ रोजीचे बयाणाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.३०** देण्यात येत आहे.

३६. आता मला उपविभागीय अधिकारी, बाळापूर यांच्या दि.२९.१२.२०१२ रोजीच्या आदेशाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. आता मला पंकज श्रीकांत इधोळ यांचे दि.२८.१२.२०१२ रोजीचे बयाणाची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदरची प्रत ही बाळापूर तहसिल कार्यालयातून योग्य ती शुल्काचा भरणा करुन काढलेली आहे. सदर दस्ताची प्रमाणित प्रत असल्याने त्यास **नि.क्र.३१** देण्यात येत आहे. तसेच आता मला दि.०१.०१.२०१३ रोजीचे नोंदणीकृत खरेदीखताची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदर खरेदीखत हे गट क्र.७, मौजे मनाळी, ता. बाळापूर, जि. अकोला या मिळकतीची असून गजानन लक्ष्मण बोरकर खरेदी देणार व पंकज श्रीकांत इधोळ यांच्यामध्ये आहे. त्यावर खरेदी घेणार म्हणून माझी सही आहे. तसेच खरेदी देणार म्हणून गजानन लक्ष्मण बोरकर यांची सही आहे, ती सही मी ओळखतो. कारण मी ती पाहिलेली आहे. सदर खरेदीखतास साक्षीदार म्हणून मनिष जयसिंग जाधव व शशिकांत गजरे रा, अकोला यांच्या देखील सह्या

असून त्या मी ओळखतो. सदर खरेदीखतातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३२** देण्यात येत आहे.

३७. आता मला अनुक्रमांक ५०७ चा फेरफार पत्रक दाखविण्यात आले. सदर फेरफार पत्रक हे तलाठी मनाळी यांच्या कार्यालयातून आवश्यक शुल्क भरुन काढलेले आहे. त्यास **नि.क्र.३३** देण्यात येत आहे. आता मला दि.०७.११.२०१३ रोजीची गाव नमुना ९ ची पावती दाखविण्यात आली. सदरची पावती ही मी पैसे भरुन मा. तलाठी, मनाळी यांच्या कार्यालयातून काढलेली आहे. त्यावर तलाठी, मनाळी यांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येत आहे.

३८. आता मला दि.११.०३.२००८ रोजीचे लिहून घेणार मी व लिहून देणार प्रकाश पंढरी पाथरकर यांच्यामध्ये गट क्र.३३, ५ हे. ३० आर जमीन पैकी १ हे. २१ आर मिळकतीचे मुळ खरेदीखत दाखविण्यात आले त्यावर लिहून घेणार म्हणून माझी सही आहे व लिहून देणार म्हणून प्रकाश पंढरी पाथरकर यांची सही आहे, ती मी ओळखतो, कारण त्यांची सही मी पाहिलेली आहे. सदर खरेदीखतावर साक्षीदार म्हणून श्रीकांत नामदेवराव इधोळ व शहा यांची सही आहे त्यांची सही मी ओळखतो. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३५** देण्यात येत आहे.

३९. आता मला फेरफार नोंद क्र.४९८ दाखविण्यात आला. सदर फेरफार हा तहसिल कार्यालय, बाळापूर येथून काढलेला आहे. त्यास **नि.क्र.३६** देण्यात येत आहे. तसेच आता मला दि.१५.०२.२०१३ रोजीची माझ्या नावे महाराष्ट्र विद्युत परिवहन वितरण कंपनी यांनी दिलेल्या कोटेशन दाखविण्यात आले त्यावर सहाय्यक अभियंता यांची सही आहे. सदरचे पत्र मुळ पत्र असल्याने त्यास **नि.क्र.३७** देण्यात येत आहे. तसेच आता मला दि.०१.०२.२०१३ रोजीची रक्कम रु.६,६००/– भरल्याची पावती दाखविण्यात आली. सदरची पावती माझ्या नावे पारीत करण्यात आलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३८** देण्यात येत आहे. तसेच आता मला दि.२२.०१.२०१३ रोजीची शेतामध्ये काढलेल्या बोअरची पावती दाखविण्यात आली. सदर पावतीतील रक्कम मी भरलेली असल्याने ती माझ्या नावे पारीत केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३९** देण्यात येत आहे.

४०. दि.२१.०१.२०१३ रोजीची बोअर करीता लागणारे केसिंग पाईपच्या बिलाची माझ्या नावाची पावती दाखविण्यात आली ती माझ्या नावे असल्याने त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४०** देण्यात येत आहे. आता मला दि.२२.०१.२०१३ रोजीचा तपासणी अहवाल दाखविण्यात आला. सदर अहवाल हा मे. सनी रॉकड्रील यांनी माझ्या नावे दिलेला असून तो बोअरच्या पाण्याच्या तपासणीबाबत आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४१** देण्यात येत आहे. तसेच दि.२३.०१.२०१३, २५.०१.२०१३ रोजीचे माझ्या नावे पारीत केलेले प्रमोद एजन्सीज चे बिलाच्या दोन प्रती दाखविण्यात आल्या. सदरचे बिले ही बोअरवर बसविलेल्या पंपाच्या स्टार्टरचे आहे. त्यास एकत्रीतपणे **नि.क्र.४२** देण्यात येत आहे.

४१. तसेच आता मला दि.२४.०१.२०१३ रोजीच्या बिलाची मुळ प्रत दाखविण्यात आली. सदरचे बिल देखील माझ्या नावे जलाराम मशिन्स यांनी पारीत केलेले असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४३** देण्यात येत आहे. आता मला दि.२४.०१.२०१३ रोजीच्या अतुल ट्रेडर्स यांना भरलेल्या रकमेचे बिल दाखविण्यात आले सदरचे बिल हे माझ्या नावाने असल्याने त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४४** देण्यात येत आहे. तसेच आता मला सप्टेंबर २०१३ च्या महावितरण कंपनीने दिलेल्या विजेच्या बिलाची प्रत दाखविण्यात आली. सदरचे बिल हे माझ्या नावे आहे. त्यास **नि.क्र.४५** देण्यात येत आहे.

४२. आता मला गट क्र.३३ च्या ७/१२ उतारा दाखविण्यात आला सदर ७/१२ उतारा हा मी आवश्यक शुल्क भरुन काढलेला आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येत आहे. तसेच गाव नमुना ८–अ चे पत्रक दाखविण्यात आले. सदर ८–अ पत्रक मी आवश्यक शुल्क भरुन काढलेला आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येत आहे. आता मला दि.२४.१२.२०१२ रोजीची माझ्या नावे शेती सिंचनाकरीता पाईपलाईन बोअर करुन टाकण्याबाबत परवानगी मिळण्याबाबतचे आदेश दाखविण्यात आले. सदर आदेश हा माझ्या नावे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अकोला यांनी पारीत केलेला असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४८** देण्यात येत आहे.

४३. आता मला दि.१४.०६.२०१५ रोजीचा बोअर नोंद केल्याचा तसेच पाईप लाईन टाकल्याबाबतचा दाखल दाखविण्यात आला सदर दाखला हा पटवारी, मनाळी, ता. बाळापूर, जि. अकोला यांनी पारीत केलेला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि.क्र.४९** देण्यात येत आहे. तसेच दि.०७.०७.२०१५ रोजीचा पटवारी, मनाळी यांनी पारीत केलेला दाखविण्यात आला. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५०** देण्यात येत आहे.

४४. आता मला दि.२३.०५.२०१४ रोजीच्या बिलाची गजानन बोअरवेल्स यांनी दिलेली माझ्या नावाची पावती दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येत आहे. तसेच दि.२३.०५.२०१४ रोजीची बोअरच्या पाणी तपासणीचा मे. गजानंद रॅकड्रील यांनी माझ्या नावे दिलेल्या अहवालाची प्रत दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५२** देण्यात येत आहे. तसेच आता मला देवानंद लक्ष्मण बोरकर यास पाठविलेल्या नोटीसचा बंद लिफाफा दाखविण्यात आला. त्यास **नि.क्र.५३** देण्यात येत आहे.

४५. तसेच आता मला दि.०४.१२.२०२३ रोजीची गजानन लक्ष्मण बोरकर व इतर दोन यांना माझ्या वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीसची स्थळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझ्या वकीलांची सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५४** देण्यात येत आहे. आता मला दि.०४.१२.२०२३ च्या नोटीस पाठविल्याच्या पोस्टाच्या एकुण ३ पावत्या दाखविण्यात आल्या. त्यास एकत्रीतपणे **नि.क्र.५५** देण्यात येत आहे.

वादी यांच्या वकीलांकडून काही मुळ कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्याकरीता सरतपास तहकुब करण्याची विनंती करण्यात आली. – मान्य.

**दिनांकः– ०४.१०.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.10.06 10:42:45 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०४/१०/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०४/१०/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०६/१०/२०२५ |